इयत्ता : बारावी [ STD. XII] : मराठी (109) [ Marathi ]

नमुना प्रश्न-पत्रिका : २०२० – २१ [Sample paper : 2020 - 21 ]

सर्वसाधारण सूचना :

1. या प्रश्नपत्रिकेत – अ आणि ब – असे दोन विभाग आहेत.
2. प्रत्येक विभाग 40 गुणांसाठी आहे. 20 गुण अंतर्गत मूल्यमापनासाठी आहेत.
2. विभाग अ मध्ये सर्व बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न आहेत.
3. विभाग अ मध्ये एकूण 53 प्रश्न असून, प्रश्नांत दिलेल्या विकल्पानुसार 40 प्रश्नांची उत्तरे अपेक्षित आहेत.
4. विभाग ब विस्तृत / विवरणात्मक उत्तरांसाठी आहे.
5. यथाशक्य एका विभागातील सर्व प्रश्नांची उत्तरे क्रमानेच यावीत.

## विभाग अ : गुण 40

**प्रश्न 1अ)** पुढील गद्य उतारा लक्षपूर्वक वाचा आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (6)

एकदा कस्तुरबा ट्रस्टच्या जागेत तेथील वयस्क, अनुभवी कार्यकर्त्यांसोबत एक संध्याकाळ घालवण्यासाठी मला शोभनाताई रानडे यांनी एका कार्यक्रमाच्या निमित्ताने बोलावले होते. कार्यक्रम छान पार पडला. नंतर सर्वांशी मोकळेपणाने गप्पा सुरु झाल्या. काही वेळाने दोघा कार्यकर्त्यांनी बाजूला बोलावले आणि म्हटले," तुम्ही तरूण आहात. अशा सामाजिक कामाला वेळ देता हे चांगलेच पण आमची तुम्हाला विनंती आहे की, तुम्ही आपल्या व्यवसायाकडे दुर्लक्ष करू नका. तो सांभाळून, कोणावर अवलंबून न राहता जेवढे समाजकार्य करता येईल तेवढे अवश्य करा." पुढे ते म्हणाले, "आम्ही जे बोलतो आहोत ते स्वानुभवातून आणि आमच्या अनेक सहकाऱ्यांच्या अनुभवावरून. आपणास कदाचित कल्पना नसेल, आम्ही, आमच्या अनेक सहकाऱ्यांनी या देशाच्या स्वातंत्र्यासाठी आयुष्य वेचले. घरेदारे सोडली, संसार केला नाही, सर्वस्वाचा त्याग केला. आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ; समाजाला आमची गरज वाटेनाशी झाली. आमच्यापैकी अनेकांना कुठेही आधार मिळाला नाही. काहींचे मरण तर अगदी रस्त्यावरील बेवारस प्राण्यांप्रमाणे झाले. समाज कृतघ्न आहे, निष्ठुर आहे. या ट्रस्टमुळे आम्हांला निदान जगण्याची तरी भ्रांत नाही. पण आमच्या अनेक सहकाऱ्यांबाबत काय बोलावे ! म्हणून म्हणतो आधी आपली आर्थिकदृष्ट्या काळजी घ्या."

या प्रतिक्रियेमुळे मी अंतर्मुख झालो. प्रामाणिकपणाची, ध्येयपूर्तीची,देशसेवेची, समाजसेवेची काळजी फक्त काही वेड्या लोकांनीच घ्यावी आणि आम्ही फक्त त्यांचे फायदे घ्यावे असे समाजाला वाटते. खरंच किती गंभीर आहे हे ! म्हटलं तर भयानक आहे. असे कित्येक ज्ञात – अज्ञात सामाजिक कार्यकर्ते आहेत. हा समाजाचा ठेवा आहे. त्याची काळजी आम्ही कशी घेणार आहोत ?

**प्रश्न** : वाचलेल्या परिच्छेदाधारे <u>कोणत्याही सहा प्रश्नांची योग्य पर्याय निवडून</u> उत्तरे लिहा. (6)

1] लेखकाच्या दृष्टीने 'समाजाचा ठेवा' कोणता ?

अ] कस्तुरबा ट्रस्ट आ] सामाजिक कार्यकर्ते इ] आपली संस्कृती

2] लेखकाला कशाचे आमंत्रण होते ?

अ] अनुभवी कार्यकर्त्यांसोबत वेळ घालवण्याचे आ] संस्थेच्या कामात लक्ष घालण्याचे

इ] व्याख्यान देण्याचे

3] लेखकाला कार्यकर्त्यांनी सल्ला दिला की, ---

अ] सामाजिक काम करा. आ] आर्थिक मदत करा.

CAREERINDIA

इ] आपला व्यवसाय प्रथम, नंतर सामाजिक कार्य.

4] लेखकाशी बोलणारे दोघे कार्यकर्ते कोण होते ?

अ] कस्तुरबा ट्रस्टचे कर्मचारी आ] स्वातंत्र्य सैनिक इ] ट्रस्टचे अधिकारी

5] 'भ्रांत नाही' - याचा अर्थ आहे –

अ] चिंता नाही. आ] भ्रम नाही. इ] भार नाही.

6] स्वातंत्र्यानंतर समाजाला कोणाची गरज वाटेनाशी झाली ?

अ] देशासाठी सर्वस्व त्यागणाऱ्यांची आ] प्रामाणिक सहकाऱ्यांची

इ] आर्थिक स्वावलंबनाची

7] कार्यकर्त्यांची प्रतिक्रिया ऐकून लेखक अंतर्मुख झाले, कारण ....

अ] समाजाचे निर्दयी व स्वार्थी रूप समजले. आ] आपल्या आर्थिक स्थितीची काळजी वाटली.

इ] कार्यकर्त्यांचे बोलणे अविचारीपणाचे होते.

**अथवा**

**प्रश्न 1 आ)** पुढील गद्य उतारा वाचून त्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (6)

निलेशने चांगल्याप्रकारे बी. कॉम पूर्ण केले. हे करत असतानाच त्याने मोबाईल फोन दुरुस्ती आणि तत्सम अन्य काही सर्टिफिकेट कोर्सेसही पूर्ण केले. शिक्षणानंतर नोकरीपेक्षा छोटासा पण आपला व्यवसाय करण्याची त्याची इच्छा होती. त्यासाठी लागेल तेवढी मेहनत करण्याची तयारीही होती. काही प्रमाणात बँकेचे कर्ज मिळवले अन् एक छोटेसे मोबाईल दुरुस्तीचे दुकान टाकले. त्याच्याकडे कामाचे कौशल्य होते, पण तरीही व्यवसायात हवा तसा जम बसतच नव्हता. तो निराश झाला. 'आपलं नशीबच खोटं !' असंच त्याला वाटे.

शाळेत शिकलेले, 'कष्टेविण फळ नाही |' असे सुविचार पाठ असतात; पण कष्ट करूनही यश मिळत नाही तेव्हा व्यक्ती नशिबाला दोष देते. नशीब, भाग्य,या अशा काही गोष्टी आहेत का नाही ते मला माहित नाही; पण कष्टाने सर्व काही साध्य होते हा एक आमचा चुकीचा समज आहे ! केवळ परिश्रमाने सफलता मिळत नाही ! आपले कष्ट, आपले प्रयत्न योग्य दिशेने केले पाहिजेत. नाहीतर 'रोप लावले त्या कोपऱ्यात, पाणी घातले या कोपऱ्यात !' – असे काय कामाचे ?

एखादे काम - मग ती नोकरी असो वा एखादा व्यवसाय - सुरु केल्यावर त्या कामातील सर्व बारकाव्यांची माहिती असणे आवश्यक आहे. या जोडीला व्यावहारिक ज्ञान, आत्मविश्वास, धैर्य,.. असे अनेक गुण महत्त्वाचे असतात. हे लक्षात न घेता केवळ नशिबाला दोष देत बसलो तर हा दैववाद निष्क्रिय बनवतो. परिश्रमासोबत अन्य कौशल्ये आत्मसात करून, कामाची योग्य पद्धत समजून घेऊन परिश्रम घेतले तरच सफलता मिळेल.

**प्रश्न** : वाचलेल्या परिच्छेदाधारे <u>कोणत्याही सहा प्रश्नांची योग्य पर्याय निवडून</u> उत्तरे लिहा. (6)

. 1] निलेश निराश झाला, कारण .....

अ] व्यवसायात जम बसला नाही. आ] शिक्षण पूर्ण नाही. इ] मेहनत करावी लागत नव्हती.

2] व्यक्ती नशिबाला तेव्हाच दोष देते, जेव्हा ......

अ] ती आळशी असते. आ] मेहनत करूनही यश मिळत नाही. इ] शिक्षण नसते.

3] 'रोप लावले त्या कोपऱ्यात, पाणी घातले या कोपऱ्यात' म्हणजे ....

अ] काम योग्य प्रकारे न करणे. आ] नशिबाला दोष देणे.

इ] योग्य दिशेने काम करणे..

4] 'नशीब खोटं' म्हणजे ...

अ] भाग्य खरे नाही. आ] देवाचा कोप इ] नशिबाची साथ नाही.

www.careerindia.com

CAREERINDIA

5] व्यवसायात यशस्वी होण्यासाठी ...

अ] फक्त भांडवलाची आवश्यकता आहे. आ] कष्ट करण्याची गरज आहे.

इ] कष्टाबरोबर अन्य अनेक कौशल्ये आवश्यक असतात.

6] लेखकाच्या म्हणण्यानुसार आमचा एक कोणता गैरसमज आहे ?

अ] केवळ परिश्रम केल्याने / कष्टाने सर्व मिळते.

आ] भाग्यात असेल तरच यश मिळते.

इ] देवाची साथ असेल तर यश मिळते.

7] या परिच्छेदात आलेल्या 'कौशल्य' या शब्दाचा अर्थ आहे ...

अ] मेहनत आ] कसब इ] प्रयत्न

**प्रश्न 2 अ**) पुढील कविता वाचून त्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (6)

ऐल तटावर पैल तटावर हिरवाळी घेऊन
निळा सावळा झरा वाहतो बेटाबेटांतून.
चार घरांचे गांव चिमुकले पैल टेकडीकडे
शेतमळ्याची दाट लागली हिरवी गर्दी पुढे
पायवाट पांढरी तयांतुनि आडवी तिडवी पडे
हिरव्या कुरणांमधुन चालली काळ्या डोहाकडे.
झाकोळूनी जळ गोड काळीमा पसरी लाटांवर
पाय टाकुनी जळात बसला असला औदुंबर .

**प्रश्न** : वाचलेल्या कवितेच्या आधारे <u>कोणत्याही सहा प्रश्नांची योग्य पर्याय निवडून</u> उत्तरे लिहा. (6)

1] या कवितेत कशाचे वर्णन आहे ?

अ] शहराचे आ] गावाबाहेरील निसर्गाचे इ] डोंगरदऱ्यांचे

2] टेकडीपलिकडे काय आहे ?

अ] छोटेसे गाव आ] काळा डोह इ] पायवाट

3] झरा कुठून वाहतो?

अ] हिरव्या कुरणातून इ] टेकडीवरून इ] बेटाबेटांतून

4] पायवाट कशी चालली आहे ?

अ] नागमोडी आ] आडवी तिडवी इ] सरळ

5] औदुंबर कसा बसलाय ?

अ] पाण्यात पाय टाकून आ] झाकोळून इ] वेडावाकडा

6] 'किनारा' यासाठी या कवितेत आलेला शब्द ....

अ] ऐल आ] तट इ] तीर

7] निळा सावळा कोण आहे ?

अ] गाव आ] झरा इ] डोह

**अथवा**

**प्रश्न 2 आ**) पुढील कविता वाचून त्या आधारे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (6)

आई तुझी माया, जसा पारिजातकाचा सडा,
ओढ्याकाठी कंटकात फुले सुगंधी केवडा
जाशील तू तेथे तुवा, माया समता पेरिली

www.careerindia.com

काही नाही दुजाभाव,सर्वां सुखाची साऊली
दंभ मत्सराचा वारा नाही शिवला देहाला
देवी गायत्रीच आली देवघराच्या दाराला !
देवळात जावयाची आम्हां नव्हतीच घाई
देव घरीच थांबले, अशी आमुची पुण्याई |
आम्हां पाठीशी बांधून घडविले गंगास्नान
संसाराच्या पूजेसाठी झिजविलेस चंदन |
हात डोळ्यांशी ठेऊन किती पाहू दूरवर
आता नाही दिसायचा, असा मायेचा पाझर |
गंगा मिळाली गंगेला आता उरे आठवण
वाटे श्रावणाचे परी न्यावी कावड वाहून |

**प्रश्न** : वाचलेल्या कवितेच्या आधारे <u>कोणत्याही सहा प्रश्नांची योग्य पर्याय निवडून</u> उत्तरे लिहा. (6)

1] आईची माया म्हणजे ....
अ] शीतल चांदणे आ] देवाचा आशीर्वाद इ] पारिजातकाचा सडा

2] आईने 'माया समता पेरली' म्हणजे ....
अ] मायेवर समता ठेवली. आ] जाईल तेथे हेवादावा केला. इ] दुजाभाव न करता प्रेम केले.

3] कोणता वारा अंगाला शिवला नाही ?
अ] उन्हाळ्याचा आ] ममतेचा इ] दंभ – मत्सराचा

4] कवीला देवळात जायची घाई नव्हती, कारण ...
अ] घरी आईच देवाच्या रुपात होती. आ] घरीच पूजा होत असे.
इ] देवावर विश्वास नव्हता.

5] ' .. आता उरे आठवण' या ओळीवरून जाणवते की ...
अ] कवी परदेशी आला आहे. आ] आईचे निधन झाले आहे. इ] कवी युद्धावर निघालाय.

6] 'काटे' या अर्थाचा कवितेतील शब्द आहे ........
अ] तुवा आ] कंटक इ] केवडा

7] संसाराच्या पूजेसाठी झिजवलेस चंदन' या ओळीत 'चंदन' म्हणजे ..
अ] आईचे जीवन आ] चंदनाचे लाकूड इ] मायेचा पाझर

**प्रश्न 3)** सूचनेनुसार उत्तरे लिहा.

**क)** दिलेल्यांपैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. (कोणतेही तीन ) (3)

1]आता मला तरी काय ठाऊक ? (वाक्याचा प्रकार ओळखा.)
अ] आज्ञार्थ आ] नकारार्थी इ] प्रश्नार्थक

2] आई वांग्याची भाजी छान करते. ( आज्ञार्थ करा.)
अ] आई वांग्याची भाजी खराब करते. आ] काय छान करते आई वांग्याची भाजी !
इ] आई वांग्याची भाजी छान कर.

3] तुकाराम भित्रा होता. ( नकारार्थी करा.)
अ] तुकाराम धाडसी कुठे होता ? आ] तुकाराम धाडसी नव्हता.
इ] काय तुकाराम भित्रा नव्हता ?

4] किती हसू येत होते मला ! ( वाक्याचा प्रकार ओळखा.)

www.careerindia.com

अ] विधानार्थी आ] नकारार्थी इ] उद्गारवाचक

**ख)** दिलेल्यांपैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. (कोणतेही तीन ) (3)

1] चिनी सैनिकांनी गोळीबार केला. (वाक्याचा प्रयोग ओळखा.)

अ] कर्तरी आ] कर्मणी इ] भावे

2] मानसी गणिताचा पेपर सोडवते. ( कर्मणी प्रयोग करा.)

अ] मानसीने गणिताच्या पेपरला सोडवले. आ] मानसीने गणिताचा पेपर सोडवला.

इ] मानसी गणिताचा पेपर सोडवेल.

3] मी तरुणांना भेटतो. ( वाक्याचा प्रयोग ओळखा.)

अ] भावे आ] कर्मणी इ] कर्तरी

4] बाबूरावांनी नातवासाठी प्रेझेंट आणले. ( कर्तरी प्रयोग करा.)

अ] बाबूरावांनी नातवासाठी प्रेझेंट आणवले.

आ] बाबूराव नातवासाठी प्रेझेंट आणतात.

इ] बाबूरावांनी नातीसाठी प्रेझेंट आणले.

**ग)** दिलेल्यांपैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. (कोणतेही तीन ) (3)

1] मी आता दक्षिण किनाऱ्याकडे वाहत जात होतो. ( वाक्याचा काळ ओळखा.)

अ] पूर्ण भूतकाळ आ] अपूर्ण भूतकाळ इ] सामान्य भूतकाळ

2] युवाशक्ती ही देशाची एकमेव खरी संपत्ती आहे. ( सामान्य भूतकाळ करा.)

अ] युवाशक्ती ही देशाची एकमेव खरी संपत्ती असते.

आ] युवाशक्ती ही देशाची एकमेव खरी संपत्ती होती.

इ] युवाशक्ती ही देशाची एकमेव खरी संपत्ती असेल.

3] संशोधनाचे काम पूर्ण केले. ( पूर्ण वर्तमान काळ करा.)

अ] संशोधनाचे काम पूर्ण केले आहे. आ] संशोधनाचे काम पूर्ण करेन.

इ] संशोधनाचे काम पूर्ण करतात.

4] शारीरिक आणि मानसिक श्रमामुळे जराही त्राण शिल्लक नव्हते. ( काळ ओळखा)

अ] सामान्य वर्तमान काळ आ] सामान्य भविष्यकाळ इ] सामान्य भूतकाळ

**घ)** दिलेल्यांपैकी योग्य पर्याय निवडून उत्तरे लिहा. (कोणतेही तीन ) (3)

1] मी तसाच वाकड्या तिकड्या अवस्थेत झोपी गेलो. ( विशेषण ओळखा.)

अ] मी आ] वाकड्या तिकड्या इ] झोपी

2] <u>आता</u> तुकारामाला घाम फुटला होता. (अधोरेखिताची शब्द-जात ओळखा.)

अ] उभयान्वयी अव्यय आ] नाम इ] क्रियाविशेषण अव्यय

3] भीतीने सारे<u>च</u> लटलटा कापत होते. ( अधोरेखिताची शब्द-जात ओळखा)

अ] क्रियाविशेषण अव्यय आ] शब्दयोगी अव्यय इ] क्रियापद

4] मग काय, चढलं की ते भूत झाडावर ! (वाक्यातील क्रियापद ओळखा.)

अ] चढलं आ] काय इ] झाडावर .

**च)** पुढील वाक्प्रचारांच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही दोन ) (2)

1. पोटात कावळे ओरडणे.

अ] पोटात खूप दुखणे. आ] भुकेने व्याकूळ होणे. इ] खूप किरकिर करणे.

2. तोंड भरून बोलणे.

www.careerindia.com

अ] खूप स्तुती करणे. आ] खूप निंदा करणे. इ] अति बोलणे.

३. भाऊबंदकी असणे.

अ] भावाभावांत प्रेमाचे बंधन असणे. आ] भावाभावांत भांडण असणे.

इ] एकमेकांची काळजी घेणे.

**छ)** वाक्यातील अधोरेखित शब्दांऐवजी वाक्प्रचाराचा योग्य पर्याय निवडा.( कोणतेही दोन) (2)

1] झाडावर जांभळे पिकायला लागली, की माकडे धिंगाणा घालतात .

अ] उच्छाद मांडणे . आ] पाळत ठेवणे . इ] डोळ वटारणे.

2] मुलांनी आपली ताकद लावली अन् शेवटी ती खिडकी उघडली.

अ] चीतपट करणे आ] बळ लावणे. इ] हिसका दाखवणे

3] मला तर आज जेवायलाही वेळ नाही.

अ] उसंत नसणे. आ] सख्य नसणे. इ] साशंक असणे.

**प्रश्न 4**) पुढील पठित गद्य उतारा वाचा, आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (6)

खरे तर इतक्या हौसेने बांधलेला नवा कोरा बंगला आपण राहण्याअगोदर दुसऱ्याला भाड्याने देण्याची कल्पना मला सहन होण्यासारखी नव्हती. पण बंगल्याच्या कर्जाचे हफ्ते अन् अमरावतीच्या घराचे भाडे – अशा दुहेरी खर्चामुळे शेवटी मी नाईलाजास्तव त्यांना होकार कळवला. दिवस जाऊ लागले. श्री. उन्नीकृष्णनकडून वेळच्यावेळी भाडे येऊ लागले. आर्थिक विवंचनेस्तव नोकरी करणाऱ्या संस्थानिकाच्या मुलासारखे फिलिंग मला येत होते. बघता बघता दोन वर्षे भुर्रकन उडाली. सतराशे साठ खटपटी करून मी पुण्याच्या बदलीची ऑर्डर मिळवली अन् पाहिले उन्नीकृष्णनना पत्र टाकले. रिटायरमेंटमुळे त्यांनाही गावी जाण्याची ओढ लागली होती. मी पुण्याकडे कूच केले. बंगल्याशी ट्रक थांबला अन माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना. बंगल्याच्या चारी बाजूस निरनिराळ्या रंगाचा बोगनवेल फुलला होता. आतल्या बाजूस विटांची टुमदार आळी होती अन् त्यात सुंदर फुलांचा ताटवा डोलत होता. चारी कॉर्नरला नारळांची अन् गेटच्या दोन्ही बाजूस अशोकाची झाडे डोलत होती.

**प्रश्न** : वरील पठित गद्य उताऱ्याच्या आधारे योग्य पर्याय निवडून कोणत्याही सहा प्रश्नांची उत्तरे लिहा.

1] लेखकाला कोणती कल्पना सहन होत नव्हती ?

अ) हौसेने बंगला बांधण्याची आ) कर्जाचे हप्ते देण्याची .

इ) नवा कोरा बंगला भाड्याने देण्याची

2] लेखकाच्या बंगल्यात उन्नीकृष्णन किती वर्षे होते ?

अ] पाच आ] दोन इ] तीन

3] लेखकाने बंगला भाड्याने देण्याचे ठरवले, कारण ......

अ] त्याला त्या घरात राहायचे नव्हते. आ] लेखक अमरावतीला रहात होते.

इ] दुहेरी खर्चाचा मेळ घालण्यासाठी.

4] 'कूच केले.' म्हणजे ....

अ] जवळ केले. आ] आक्रमण केले. इ] जायला निघाले.

5] लेखकाचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना,कारण ......

अ] बंगल्याभोवती गवताचे रान माजले होते. आ] बंगल्याभोवती सुंदर बाग होती.

इ] बंगल्यात तिसरेच कुणी रहात होते. .

6] बंगल्याच्या गेटच्या दोन्ही बाजूस होती, ....

अ] अशोकाची झाडे . आ] बोगनवेली इ] नारळाची झाडे.

www.careerindia.com

CAREERINDIA

7] लेखकाच्या मते, श्री. उन्नीकृष्णन म्हणजे ....

अ] एक सच्चा माणूस आ] चिवट भाडेकरू इ] वृक्षवल्लीचा सोयरा.

**प्रश्न 5**) पुढील पठित पद्य उतारा वाचा, आणि विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (6)

धरत्रीच्या कुशीमधी बीयबियानं निजली
वऱ्हे पसरली माटी जशी शाल पांघरली
बीय टरारे भुईत सर्वे कोंब आले वऱ्हे
गहयरलं शेत जसं आंगावरती शहारे
ऊन वाऱ्याशी खेयता एका एका कोंबातून
पर्गटले दोन पानं जसे हात जोडीसन
टाया वाजवती पानं दंग देवाच्या भजनी
जसे करती कारोन्या होऊ दे रे आबादानी
दिसामासा व्हये वाढ रोपं झाली आता मोठी
आला पिकाले बहार झाली शेतामधी दाटी
आला पिकाले बहार झाली शेतामधी दाटी
कसे वाऱ्यानं डोलती दाने आले गाडी गाडी
दैव गेलं रे उघडी देव अजब गारोडी !

**प्रश्न** : वरील कवितेच्या आधारे योग्य पर्याय निवडून कोणत्याही सहा प्रश्नांची उत्तरे लिहा.

1] या कवितेचे कवी / कवयित्री आहेत ...........

अ] बहिणाबाई चौधरी आ] शांता शेळके इ] विंदा करंदीकर

2] धरतीच्या कुशीत निजलेल्यांच्या अंगावर ............. शाल पांघरली.

अ] उबदार आ] मातीची इ] मायेची

3] ' गहयरलं शेत' म्हणजे .......

अ] शेत दु:खी झालं. आ] शेताचा थरकाप उडाला. इ] शेतात कोंब तरारून आले.

4] पानं कशी प्रकटतात ?

अ] वाऱ्याशी खेळता खेळता आ] सूर्याकडे पहात इ] रोपांतून

5] प्रकटलेली पानं कशात दंग होती ?

अ] टाळ्या वाजवण्यात आ] अभिनंदन करण्यात इ] देवाच्या भजनात

6] 'जसे करती कारोन्या होऊ दे रे आबादानी' – या ओळीचा भावार्थ आहे ...........

अ] जणू प्रार्थना करतात की संपन्नता येऊ दे. आ] हा करोन्या जावो.

इ] जणू कृपा करतात की, सर्वत्र संपन्नता येवो. .

7] ही कविता कोणत्या बोली भाषेत आहे ?

अ] अहिराणी आ] कोकणी इ] वऱ्हाडी

## विभाग ब : गुण : 40

**प्रश्न 6**. पुढीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची प्रत्येकी २५ / ३० शब्दांत उत्तरे लिहा. (10)

1. गावच्या सोनाराला भूत सोने का आणून देत होते ?
2. स्त्रीच्या कपाळावर कशाचे गोंदण असते आणि तिला लग्नात आंदण म्हणून काय मिळते?
3. मानसीला पेपर लिहिताना उन्हाच्या तिरिपेची सवय व्हावी यासाठी रवी-रश्मी यांनी काय केले?
4. कर्नल चव्हाण यांनी चिनी शिपायाने दिलेले पीठ कोणत्या विचाराने खाल्ले?

www.careerindia.com

CAREERINDIA

5. 'अति काळजीचे परिणाम' या पाठातून कोणता संदेश दिला आहे?
6. मनातील प्रेमभाव व्यक्त न करता कवीने काय केले ?
7. 'आकाशाचे डोळे कोरडेच' असे कवी फ. मुं. शिंदे का म्हणतात ?
8. साधूचे अंतरंग कसे असते?

**प्रश्न 7.** पुढीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे 60 / 70 शब्दांत लिहा. (15)

1. मानसीच्या दहावीच्या परीक्षेची अशी (अ)पूर्व तयारी तिचे आई बाबा का करून घेत होते ?
2. 'भुताचा जन्म' या पाठाधारे तुकाराम लांडगेचे वर्णन करा.
3. संत शेख महंमद यांनी इंद्रावन फळ व कपटी व्यक्ती यातील साम्य कसे सांगितले आहे ?
4. यंत्रमानवाने ऑसिमोव्हचे कोणकोणते नियम सांगितले ?
5. कवयित्री शांता शेळके यांच्या 'खांब' कवितेच्या आधारे स्त्री घरासाठी कशी राबते ?
6. उन्नीकृष्णन पती–पत्नी यांच्या लेखकाच्या घराभोवती बाग फुलवण्यामागे कोणत्या भावना होत्या ?
7. चिनी सैनिकांनी पत्र्याच्या पेटाऱ्यात कोंबल्यावर लेखकाची अवस्था कशी झाली ?
8. 'बहरतील मळे' या कवितेतून कवी फ. मुं. शिंदे यांनी कोणता आशावाद व्यक्त केला आहे ?

**प्रश्न 8** . पुढीलपैकी एका विषयावर सुमारे 150 / 200 शब्दांत निबंध लिहा. (10 )

[ दिलेल्या मुद्द्यांचा आधार घेऊन आपले मत / विचार / कल्पना मांडू शकता.]

1. भारतातील शेतकरी .

   भारत शेतीप्रधान देश.
   निसर्गाचा प्रभाव
   शेतकऱ्याच्या अडचणी / समस्या.
   स्थिती सुधारण्यासाठी काय –काय करता येईल

2. मोबाईल फोन

   या फोनचे नवे युग.
   या फोनचे बहुविध उपयोग
   या फोनमुळे शिक्षण, उद्योग अशा वेगवेगळ्या क्षेत्रात होणारे लाभ.
   वाईट परिणाम ; त्यासाठी उपाय

3. 'लॉक डाऊन' आणि शहरी जीवन

   शहरात सतत धावपळ .. कशासाठी
   'लॉक डाऊन' का, त्याचे स्वरूप काय
   कौटुंबिक जीवनावर कसा/ कोणता परिणाम.
   यामुळे सामाजिक, सार्वजनिक जीवनावरील परिणाम.
   निसर्ग, पशु / पक्षी यांच्यातील बदल

4. सैनिकांचे बलिदान !!

   देशाच्या विकासाचे वेगवेगळे घटक .. शेतकरी, उद्योग-धंदे, कामगार तसेच सैनिक
   सैनिकांच्या कामाचे स्वरूप
   कोणत्या परिस्थितीत काम करतात.
   त्यांच्याप्रति आमचे कर्तव्य इ.

www.careerindia.com

CAREERINDIA

**प्रश्न 9. [अ]** पुढीलपैकी एका विषयावर सुमारे 70 / 80 शब्दांत संवाद लिहा. (5)

1. 'वृक्ष संवर्धन' या संबंधी आजोबा आणि त्यांचा नातू यांच्यातील संवाद.
2. 'स्वच्छतेची जबाबदारी आपणा सर्वांची' याबाबत दोन मित्रांतील संवाद.

अथवा

**[ब]** पुढीलपैकी एका विषयावर बातमी तयार करा. [5]

1. आपल्या विद्यालयातील / महाविद्यालयातील ' काव्य वाचन' स्पर्धेचे वृत्त लिहा.
2. खाली दिलेली जाहिरात वाचा आणि .....

> सर्व गावकऱ्यांना आग्रहपूर्वक निमंत्रण
> श्री.व्याघ्रेश्वर विद्यालय, पिंपळगाव
> द्वारा सुरु केलेल्या
> 'खत निर्माण' प्रकल्पाचा उद्घाटन समारंभ सरपंच
> श्री.दादासाहेब पाटील
> यांच्या हस्ते संपन्न होत आहे,
> दिनांक 5 जून वेळ : सकाळी 10
> स्थळ : शाळेचे मैदान

या जाहिरातीतील समारंभाला आपण उपस्थित होतात, असे समजून या घटनेची बातमी तयार करा.

******************

www.careerindia.com